वाचा :– 1. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक निरिक्षण–1/33/2021, दिनांक 16/04/2021 व त्यासोबतचे परिपत्रक.
2. जिल्हा न्यायालय, जालनाचे कार्यालयीन आदेश क्र. बी–4 (1)/82/2021, दिनांक 06/04/2021.
3. जिल्हा न्यायालय, जालनाचे कार्यालयीन आदेश क्र. बी–4 (1)/83/2021, दिनांक 06/04/2021.

---

**जिल्हा व सत्र न्यायालय, जालना**

**: कार्यालयीन आदेश ::**

(क्रमांक बी–4 (1) /८६/2021)

संदर्भ क्रमांक 02 वर नमुद या कार्यालयाचे कार्यालयीन **आदेशाऐवजी** आता संदर्भ क्रमांक 01 वर नमुद मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पत्र व त्यासोबातच्या परिपत्रकान्वये वाढत्या कोरोना विषाणुच्या प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणुन निम्नस्वाक्षरीत हया जालना न्यायीक जिल्हयाच्या आस्थापनेवरील सर्व न्यायालयीन कामकाज व कार्यालयीन कामकाज एकाच सत्रात कार्यान्वित ठेवणे व वेळेबाबत खालील प्रमाणे नव्याने आदेश निर्गमीत करीत आहेत.

सदरील आदेश **दिनांक 19/04/2021** ते पुढील आदेशापर्यंत लागू राहिल.

| | | |
|---|---|---|
| 1 | जालना न्यायीक जिल्हयातील सर्व न्यायालयीन कामकाजाची वेळ | सकाळी 11.00 ते दुपारी 01.30 |
| 2 | जालना न्यायीक जिल्हयातील सर्व न्यायालयातील कार्यालयीन कामकाजाची वेळ | सकाळी 10.30 ते दुपारी 01.30 |

उपरोक्त वेळेत न्यायालयीन कामकाजामध्ये रिमांडचे कामकाज, सर्व प्रकारचे जामीन अर्ज आणि सर्व दिवाणी व फौजदारी प्रकरणांचे तातडीचे कामकाज सुरु राहतील. उपरोक्त कालावधीत न्यायालयातील कर्मचारीवृंद हा आळीपाळीने (Alternative) 50 टक्के कार्यालयात हजर राहतील. ( संदर्भ क्रमांक 03 वरील या कार्यालयाचे आदेशात नमुद सम–विषम तारखेप्रमाणेच जिल्हा न्यायालय, जालनाच्या आस्थापनेवरील कर्मचारी उपरोक्त वेळेत कार्यालयात हजर राहतील. )

तसेच जिल्हा न्यायालय आणि त्यांचे अधिपत्याखालील सर्व तालुका न्यायालयाच्या परिसरातील/इमारतीमधील वकील संघाचे कक्ष आणि उपहारगृहे पुढील आदेशापर्यंत बंद राहतील.

उपरोक्त नमुद न्यायालयीन कामकाजाच्या वेळेतच रिमांडचे कामकाज स्विकारले जातील या बाबतचे निर्देश संबंधीत पोलीस स्टेशनला आपल्या स्तरावर देण्यांत यावेत. तसेच पुढील आदेशापर्यंत प्रत्येक शनिवारी न्यायालयास व त्यांचे कार्यालयास सुट्टी राहील.

या व्यतिरिक्त यासोबत संदर्भ कमांक 01 वर नमुद मा. उच्च न्यायालयाचे परिपत्रकाची छायांकित प्रत सर्व सन्माननीय न्यायिक अधिका–यांना अवलोकनास्तव व कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.

स्वाक्षरीत/–

जिल्हा व सत्र न्यायालय, {} (श्रीमती एस. के. केवले)
{} प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
जालना. दिनांक : 17/04/2021 {} जालना

जा.क्र.आस्था/1922/2021
दिनांक :– 17/04/2021

याची एक प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

1. जिल्हा न्यायाधीश–1, 2, 3, 4, 5 व 6, जालना.
2. तदर्थ जिल्हा न्यायाधीश–1, जालना.
3. जिल्हा न्यायाधीश–1, अंबड.
4. अतिरिक्त सह जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना.
5. न्यायाधीश , कौटुंबिक न्यायालय, जालना
6. औद्योगिक न्यायालय, जालना
7. कामगार न्यायालय, जालना
8. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, जालना / अंबड.
9. मुख्य न्यायदंडाधिकारी, जालना.
10. सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जालना.
11. सह/2रे /3रे/ 4थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, जालना.
12. सह/ 2रे /3रे व 4थे दिवाणी न्यायाधीश क.स्तर, जालना.
13. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, अंबड/परतुर/भोकरदन/जाफ्राबाद/बदनापूर/मंठा /घनसावंगी.
14. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अंबड/परतूर/भोकरदन/घनसावंगी/बदनापूर.
15. 2रे/3रे / 4थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, अंबड.
16. अध्यक्ष, वकील संघ, जालना/अंबड/परतुर/भोकरदन/जाफ्राबाद/बदनापूर/मंठा घनसावंगी.
17. जिल्हा सरकारी अभियोक्ता कार्यालय, जालना.
18. सहायक संचालक कार्यालय, जालना.
19. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना
20. पोलीस अधिक्षक, जालना यांना देउन विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक जालना जिल्हयाच्या हद्दीतील सर्व पोलीस स्टेशनच्या निदर्शनास आणून दयावे.
21. अधिक्षक, जिल्हा कारागृह, जालना.
22. अधिक्षक, न्यायिक / आस्थापना विभाग, जिल्हा न्यायालय, जालना.
23. सहा. अधिक्षक, ई–सुविधा / वित्त /अभिलेख विभाग, जिल्हा न्यायालय, जालना.
24. संगणक विभाग प्रमुख, जिल्हा न्यायालय, जालना.
25. सुचना फलक, जिल्हा न्यायालय, जालना

जिल्हा व सत्र न्यायालय, {} (श्रीमती एस. के. केवले)
{} प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश
जालना. दिनांक : 17/04/2021 {} जालना